# GYMKHANA REPORT
# (2019-2020)

**स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या जिमखाना विभागामार्फत शैक्षणिक वर्ष 2019. 2020 मध्ये जे विविध कार्यक्रम घेण्यात आले त्याचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे :**

❖ **राजर्शी छत्रपती शाहू महाराज जयंती :–**

महाविद्यालयातील जिमखाना व ग्रंथालय विभागामार्फत दि. 26 जून रोजी शाहू जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी शाहूंच्या प्रतिमेला पुश्पहार अर्पण करुन प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले यांनी प्रश्नमंजुशा स्पर्धेला सुरुवात केली. शाहूंच्या जीवन व कार्यावर आधारीत प्रश्नमंजुशा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रम प्रसंगी डॉ. उज्वला सामंत, प्रा. संग्रामसिंह पवार, डॉ. सुमेधा नाईक यांनी शुभेच्छा दिल्या. डॉ. श्रीरंग मंडले यांनी शाहूंचे कार्य विद्यार्थ्यांसमोर ठेवले. आभार जिमखाना प्रमुख प्रा. एच. एम. चौगले यांनी मानले..



Scanned by CamScanner

### ❖ गुरुपौर्णिमा व करीअर मार्गदर्शन :–

महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटना व जिमखाना विभागामार्फत गुरुंचा सत्कार व विद्यार्थ्यांना करीअर मार्गदर्शन करण्यात आले. यानिमित्ताने सेवानिवृत्त प्राध्यापक श्री. पी. पी. नायगावकर व प्राध्यापिका डॉ. पी. पी. नायगांवकर यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर मालवण पोलीस स्थानक येथील पी. एस. आय. मोमिन मॅडम यांनी विद्यार्थ्यांना करीअर विषयक मार्गदर्शन केले. याप्रसंगी श्री. सुधीर धुरी, प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते त्याचबरोबर एल. आय. सी. मालवण येथील श्री. गवाणकर साहेब यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला.

### ❖ नारळी पौर्णिमा – नारळ लढविणे स्पर्धा

दि. 14 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयामध्ये नारळी पौर्णिमेनिमित्त 'नारळ लढविणे' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत 45 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यामधून 2 विद्यार्थी व 2 विद्यार्थ्यांनींना पारितोशिक देण्यात आले.

विद्यार्थी :–

प्रथम – कु. संकेत मेतर,
द्वितीय – कु. अंकित कोवळे,

विद्यार्थीनी :–

प्रथम – कु. अंगारिका सारंग,
द्वितीय – दिव्या मंडलीक

या निमित्ताने व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, डॉ. आर. एन. काटकर, डॉ. भावके, डॉ. हारगिले, डॉ. सुमेध नाईक, प्रा. बी. एच. चौगुले, डॉ. यु. वाय. सामंत, प्रा. एच. एम. चौगले, डॉ. एम. आर. खोत, सर्व सायन्स स्टाफ, प्रा. हसन खान, बर्वे मॅडम आदी उपस्थित होते



Scanned by CamScanner

### ❖ कृष्ण जन्माष्टमी – दहीहंडी स्पर्धा :–

प्रतिवर्षाप्रमाणे 24 ऑगस्ट 2020 रोजी कृष्ण जन्माष्टमी निमित्त महाविद्यालयामध्ये दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एन.एस.एस., एन.सी.सी. व स्पोर्टस विभागातील विद्यार्थ्यांनी ही सहभाग घेतला. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी वेगळी व विद्यार्थ्यांनींसाठी वेगळी अशा दोन दहीहंडी फोडण्यात आल्या. प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले व सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे नियोजन जिमखाना विभाग प्रमुख प्रा. एच. एम. चौगले व डॉ. सुमेधा नाईक यांनी केले.

### ❖ गांधी जयंती निमित्त निबंध स्पर्धा :–

2 ऑक्टोबर गांधी जयंती निमित्त जिमखाना विभागामार्फत 28 सप्टेंबर रोजी निबंध स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये 20 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. गांधीजींचे जीवन व कार्य या विषयावरील या स्पर्धेत अनुक्रमे कु. वृशिता फणसे प्रथम, कु. दिक्षीता आंगणे द्वितीय व कु. अंकीत कोवळे तृतीय यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या तिन्ही विद्यार्थ्यांना विधी विभाग मालवण तालुका यांच्यातर्फे गौरविण्यात आले. डॉ. श्रीरंग मंडले यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### ❖ स्वच्छता शपथ :–

दि. 3 ऑक्टोबर 2019 रोजी भारत सरकारच्या निर्देषानुसार महाविद्यालयाच्या पटांगणामध्ये स्वच्छता शपथ घेण्यात आली. यामध्ये प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले व सर्व प्राध्यापक वर्ग सहभागी होता. एन.एस.एस. व एन.सी.सी. व इतर सर्व विभागातील विद्यार्थी या कार्यक्रमामध्ये सहभागी होते.



Scanned by CamScanner

### ❖ कॅरम स्पर्धा :–

जिमखाना विभागामार्फत महाविद्यालयातील जिमखाना हॉलमध्ये दि. 7 डिसेंबर 2019 रोजी कॅरम स्पर्धेचं आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्‌घाटन कृ. सी. देसाई शिक्षण मंडळाच्या जिमखाना विभाग प्रमुख डॉ. राहुल पंत वालावलकर यांच्या हस्ते झालं. यावेळी प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, डॉ. एम. आर. खोत, प्रा. बी. एच. चौगुले, प्रा. एस. पी. खोबरे, डॉ. सुमेधा नाईक, डॉ. आर. एन. काटकर, डॉ. डी. व्ही. हारगिले व विद्यार्थी उपस्थित होते. या स्पर्धेत 26 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये अनुक्रमे कु. देवेन कोळंबकर प्रथम तर कु. अंकित कोवळे द्वितीय मुलींमध्ये कु. दिव्या मंडलिक प्रथम तर कु. कोमल जोशी हिने द्वितीय क्रमांक पटकावलास्पर्धेसाठी परीक्षक म्हणून महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी श्री. रोहन वाळके लाभले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना प्रमुख प्रा. एच. एम. चौगले यांनी व आभार डॉ. सुमेधा नाईक यांनी मानले.

### ❖ आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा सावंतवाडी :–

शैक्षणिक वर्ष 2019–20 च्या आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा सावंतवाडी महाविद्यालयातर्फे सावंतवाडी जिमखाना येथे पार पडल्या. स्पर्धेच्या उद्‌घाटनाचा सामना स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय विरुद्ध लांजा महाविद्यालय असा रंगला. या सामन्यामध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुंदर खेळाचं प्रदर्शन केल पण दुर्देवाने आपला निसटता पराभव झाला. या स्पर्धेत कु. सुकृत जोशी याच्या नेतृत्वाखाली 15 विद्यार्थ्यांनी खेळात सहभाग घेतला टीम मॅनेजर म्हणून प्रा. एच. एम. चौगले उपस्थित होते.



Scanned by CamScanner

## ❖ आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धा –

लांजा :– आपल्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गात शिकत असलेली कु. अंगारिका सारंग या विद्यार्थीनीने लांजा महाविद्यालय येथे पार पडलेल्या झोन क्र. 5 आंतर महाविद्यालयीन 10 कि. मी. क्रॉसकंट्री स्पर्धेत सहभाग घेतला व ही स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले कार्याध्यक्ष मा. श्री. बाळासाहेब पंतवालावलकर व प्राध्यापक वर्गाने तीच अभिनंदन केले व शुभेच्छा व्यक्त केल्या.

## ❖ युवा महोत्सव 2019 (डिसेंबर) :–

प्रतिवर्षाप्रमाणे डिसेंबर 2019 मध्ये महाविद्यालयाचा युवा महोत्सव साजरा करण्यात आला जिमखाना विभागामार्फत या युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, संस्थेचे सचिव, सर्व सदस्य व सेवक वर्गाने युवा महोत्सव पार पाडण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. यावर्षी अत्यंत शिस्तबद्ध रीतीने युवा महोत्सव पार पडला. या युवा महोत्सवामध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

**1) अंताक्षरी डे** (ब्लॅक व्हाईट, टाय, साडी, गॉगल डे) :–

दि. 19 डिसेंबर रोजी युवा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अंताक्षरी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सर्व वर्गांनी सहभाग घेतला होता. यामध्ये टी.वाय.बी.कॉम प्रथम, टी.वाय.बी.ए. द्वितीय तर एफ.वाय.बी.ए. या वर्गाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.



Scanned by CamScanner

**2) मालवणी डे :–**

दि. 20 डिसेंबर रोजी महाविद्यालयामध्ये मालवणी डे साजरा करण्यात आला. यामध्ये सर्व वर्गांनी वेगवेगळे खाद्य पदार्थ बनविले होते. सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व सेवक वर्गाने या खाद्य पदार्थांचा आस्वाद घेतला

**3) पारंपारिक डे :–**

दि. 21 डिसेंबर रोजी महाविद्यालयामध्ये पारंपारिक दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयातील प्रत्येक वर्गाने वेगळी थीम निवडून वेगवेगळी वेशभूशा साकारली होती. भारतीय संस्कृतीचे दर्शन यामधून दिसून आले

**4) स्पोर्टस् डे / क्रीडा दिवस :–**

दि. 22 डिसेंबर रोजी रेवतळे येथील मैदानावर 'स्पोर्ट्स डे' साजरा करण्यात आला. यामध्ये प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले यांनी श्रीफळ वाढवून स्पर्धेचे उद्‌घाटन केले. याप्रसंगी प्राध्यापक बी.एच.चौगुले, प्रा. एम.आर.खोते, डॉ. सुमेधा नाईक, प्रा. हसन खान, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. एफ.वाय.बी.ए., एस.वाय.बी.ए., एफ.वाय.बी.कॉम., एस.वाय.बी. कॉम व कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघानी या स्पर्धेत सहभाग घेतला. यामध्ये एस.वाय.बी. कॉम. या वर्गाने प्रथम क्रमांक प्राप्त केला.



Scanned by CamScanner

**5) मुख्य सांस्कृतिक कार्यक्रम :-**

दिनांक 23 डिसेंबर रोजी सकाळी ठीक अकरा वाजता मुख्य सांस्कृतिक कार्यक्रमातील सुरुवात झाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, सचिव श्री. गणेश कुशे, श्री. साईनाथ चव्हाण सर्व प्राध्यापक वर्ग, माजी विद्यार्थी संघटना तसेच संस्थेचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमामध्ये नृत्य, अभिनय, समूह नृत्य, गायन आदी कार्यक्रम सादर झाले दुपारी 03.30 वा. कार्यक्रमाची सांगता झाली

**6) फिश पॉंड डे :-**

दि. 24 डिसेंबर रोजी महाविद्यालयामध्ये फिश पॉंड डे साजरा करण्यात आला. यामध्ये प्रातिनिधीक विद्यार्थ्यांनी व्यासपीठावर फिशपोंडचे वाचन केले. ललीत चव्हाण, अजय आळवे, दिव्या कुलकर्णी यांचा समावेष होता. या कार्यक्रमाने युवा महोत्सवाची सांगता झाली.

**❖ मकर सक्रांती निमित्त वर्ग सजावट स्पर्धा :-**

मकर सक्रांती निमित्त दि. 15 जानेवारी रोजी महाविद्यालयामध्ये 'वर्ग सजावट' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सर्व वर्गांनी यामध्ये सहभाग घेतला. परीक्षण डॉ. सुमेधा नाईक, बर्वे मॅडम, प्रा. मसुरकर मॅडम यांनी केले. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :-



Scanned by CamScanner

प्रथम क्रमांक :– एस. वाय. बी. कॉम
द्वितीय क्रमांक :– एफ. वाय. बी. एस्सी
तृतीय क्रमा ंक :– टी. वाय. बी. कॉम
तृतीय क्रमांक :– एस. वाय. बी. ए.

❖ **वार्शिक पारितोशिक वितरण व 'पदवीदान समारंभ' :–**

शैक्षणिक वर्ष 2019–2020 चा वार्षिक पारितोशिक व पदवी वितरण समारंभ दि. 04 फेब्रुवारी 2020 रोजी महाविद्यालयाच्या झांटये सभागृहामध्ये साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे आदरणीय कार्याध्यक्ष मा. बाळासाहेब पंतवालावलकर अध्यक्ष म्हणून लाभले तर प्रमुख पाहुणे म्हणून मालवण पोलीस स्थानकाचे पी.एस.आय.श्री. भारत फारणे व पी.एस.आय.श्री. पाटील साहेब लाभले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले व्यासपीठावर उपस्थित होते. पारितोशिक व बक्षिस वितरण प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब पंतवालावलकर, श्री. साईनाथ चव्हाण व डॉ. श्रीरंग मंडले यांच्या हस्ते झाले. तसेच प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले यांनीही पारितोशिक वितरण केले. संस्थेचे सचिव श्री. गणेश कुशे, संस्थेचे सदस्य श्रीसंदेश कोयंडे, श्री. साईनाथ चव्हाण, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सुधीर धुरी, महाविद्यालयातील सर्व स्टाफ उपस्थित होता. यावेळी 50 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बी. एच. चौगुले व डॉ. सुमेधा नाईक यांनी केले तर प्रास्ताविक जिमखाना प्रमुख प्रा. एच. एम. चौगले यांनी केले



Scanned by CamScanner

## ❖ महाविद्यालया समोरील मार्गाचं उद्घाटन :–

दि. 04 फेब्रुवारी 2020 रोजी आपल्या महाविद्यालया समोरील रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. बाळासाहेब पंतवालावलकर सचिव श्री. गणेश कुशे, मा. श्री. साईनाथ चव्हाण, श्री. केनवडेकर, मालवण नगरीचे नगराध्यक्ष श्री. महेश कांदळगांवकर, श्री प्रमोद ओरसकर, माजी विद्यार्थी संघटना अध्यक्ष श्री. सुधीर धुरी संस्थेचे सदस्य श्री. संदेष कोयंडे, श्री. देसाई अन्य मान्यवर सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, डॉ. आर.एन. काटकर, डॉ. भावके, डॉ. हारगिले, डॉ. सुमेधा नाईक, प्रा. एच, एम. चौगले, डॉ. एम. आर. खोत, प्रा. एस. पी. खोबरे, प्रा. संग्रामसिंह पवार अन्य प्राध्यापक वर्ग, कर्मचारी वर्ग व सेवक वर्ग उपस्थित होता. या मार्गाचं उद्घाटन मालवणचे प्रथम नागरिक श्री. महेश कांदळगांवकर व श्री बाळासाहेब पंतवालावलकर साहेब यांच्या हस्ते झालं

## ❖ 14) प्रहसन स्पर्धा :–

युवा महोत्सवानिमित्त प्रहसन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तीन वर्गांनी सहभाग घेतला होता. यामध्ये एस. वाय. बी. कॉम. च्या 'जनगणना' हे प्रहसन प्रथम तर 'दोस्त' ला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. परीक्षण डॉ. सुमेधा नाईक यांनी केले.

**Prof. H. M. Chougale**
Gymkhana Chairman

Scanned by CamScanner

## S. K. Patil Sindhudurg Mahavidyalaya, Malvan

## Student Council Election

## 2019-2020

| | | |
|---|---|---|
| 1. | Lalit Chavan | T. Y. B.Com. (Sports) |
| 2. | Hrutu Govekar | T. Y. B.Com. (LR) |
| 3. | Sanjay Valkar | T. Y. B. A. |
| 4. | Yashashri Varak | T. Y. B. A. (LR) |
| 5. | Mayur Pednekar | T. Y. B.Sc. |
| 6. | Harshali Manjarekar | T. Y. B.Sc. |
| 7. | Ajay Aalve | S. Y. B. Com. (Cultural) |
| 8. | Harshali Chavan | S. Y. B. Com. |
| 9. | Prathamesh Samant | S. Y. B. A. |
| 10. | Usha Ymkar | S. Y. B. A. (NSS) |
| 11. | Akshay Kadam | S. Y. B.Sc. |
| 12. | Ankita Masurkar | S. Y. B.Sc. |
| 13. | Pankaj Kavatkar | F. Y. B. Com. |
| 14. | Pratiksha Pendurkar | F. Y. B. Com. |
| 15. | Pravinkumar Nadgeri | F. Y. B. A. |
| 16. | Bhavana Karalkar | F. Y. B. A. |
| 17. | Kiran Bhave | F. Y. B.Sc. |
| 18. | Bhagyashri Manjarekar | F. Y. B.Sc. (NCC) |

जिमखाना प्रमुख

for Principal
S. K. Patil Sindhudurg Mahavidyala
MALVAN, (Dist. Sindhudurg)

Scanned by CamScanner